ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख २८ नोव्हेंबर, १९५१ अंक ४५

## विविध माहिती

**कोलंबो प्रदर्शनांत भारत भाग घेणार**—१९५२ च्या फेब्रुआरी १५ पासून १५ मार्च पर्यंत कोलंबो योजनेची माहिती देणारें एक प्रदर्शन सीलोनमधील कोलंबो ह्या शहरीं भरणार आहे. प्रदर्शनांत भारत भाग घेणार आहे, असें समजतें.

**अमेरिकन सरकारची देणगी**—भारतीय सरकारच्या नॅशनल फिजिकल लॅबोरेटरीला अमेरिकन सरकारनें ५५,००० डॉलर्स म्हणजे सुमारें २ लाख, ७५ हजार रुपयांची देणगी दिली आहे. देणगीचा उपयोग द्रव हेलिअम वायु तयार करण्याच्या यंत्रसाहित्यासाठी करावयाचा आहे. ही देणगी द. आशिआला देण्यांत येणाऱ्या आर्थिक मदतीनुसार देण्यांत आली आहे. देणगी मिळविण्याच्या कामीं डॉ. भाटनगर ह्यांचें साह्य झालें.

**मोटारी खपविण्यासाठी**—कानडामध्यें सध्या मोटारींच्या विक्रीमध्यें चांगलीच मंदी आली आहे. गिऱ्हाइकांना मोटार घेण्यास प्रलोभन म्हणून टोरोंटोमधील एका विक्रेत्यानें पुढीलप्रमाणें वस्तू देण्याचें जाहीर केलें आहे. ६७० पौंड किंमत असलेली नवीन मोटार खरेदी करणाऱ्यास ६२ पौंड किंमतीचा एक टेलिव्हिजन सेट मोफत देण्यांत येणार आहे आणि ५१८ पौंड किंमतीची मोटार घेणारास ६० पौंड किंमतीचा एक रेफ्रिजरेटर देण्यांत येणार आहे.

**ब्राझिलमध्यें तागाचा खप**—१९५० मध्यें ब्राझिलमधील कारखान्यांनीं ४५,८०० टन इतका ताग अगर तत्सम वस्तू वापरल्या. भारताकडून २०,००० टन ताग आयात करण्याची खटपट सदर कारखाने ब्राझिल सरकारमार्फत करीत आहेत. तागाची खरेदी करण्यासाठीं ब्राझिलचें सरकार एक कायमचें कमिशनच नेमणार आहे.

**कॅनडाकडून शिष्यवृत्त्या**—रसायनशास्त्र, पदार्थ विज्ञानशास्त्र बायो-केमिस्ट्री आणि मायक्रो-बायॉलजी विषयक संशोधन करण्यासाठीं कॅनडाच्या सरकारनें भारतीय संशोधकांना २९ शिष्यवृत्त्या देऊं केल्या आहेत. अविवाहित संशोधकांना २,८२० कॅनेडिअन डॉलर्स आणि विवाहित संशोधकांना ३,३०० कॅनेडिअन डॉलर्स दरवर्षीं मिळणार आहेत. शिष्यवृत्त्यांची मुदत एक वर्षाची असून अर्ज करून ती आणखी एक वर्ष वाढवितां येण्यासारखी आहे.

**इंग्लंड भारतीय रेशमाच्या वस्तू घेणार**—ब्रिटनच्या बोर्ड ऑफ ट्रेडनें भारताकडून रेशमाच्या पुढील वस्तू खुल्या परवान्यानें आयात करण्याचें ठरविलें आहे. रेशमी कापड, ब्रोकेड, गळपट्टे व शाली आणि रेशमी कापडाच्या पिशव्या.

**मँगेनीजची निर्यात**—मँगेनीज हा खनिज धातू युद्धाच्या अर्थशास्त्रांत फार महत्त्वाचा आहे. भारत हा मँगेनीजच्या उत्पादनांत पहिला आहे. मँगेनीझ अमेरिकेला निर्यात करून भारताला दुर्मिळ अशा डॉलर्सची प्राप्ति होते. १९५० सालीं भारतानें ६,२८,७०० टन मँगेनीज निर्यात केलें. त्याची किंमत सुमारें १,०२,००,००० रुपये आली. निर्यातीपैकी निम्मा भाग अमेरिकेनें विकत घेतला.

**अमेरिकेंत मोटारीच्या किंमती वाढणार**— अमेरिकेंतील मोटारींच्या किंमती येत्या दोन आठवड्यांत अधिकृतपणें वाढविण्यांत येणार असल्याचें समजतें. सध्याच्या किंमतीपेक्षा वाढलेल्या किंमती सुमारें ४ टक्क्यांनीं अधिक असतील असा अंदाज करण्यांत आला आहे.

**जागतिक बँकेकडून पाकिस्तानला कर्ज**—जागतिक बँकेकडून पाकिस्तानला ५ ते ६ कोटी डॉलर्सचें कर्ज मिळणार असल्याचें समजतें. कर्जाबाबत वॉशिंग्टन येथें सुमारें ३ महिने वाटाघाटी चालल्या होत्या. रेल्वेचे रस्ते, वीज, शेतीचीं अवजारें इत्यादींसाठीं कर्जाचा विनियोग करण्यांत यावयाचा आहे. कर्जाचा पक्का करार करण्यासाठीं बँकेचा एक अधिकारी लवकरच कराचीला जाणार आहे.

**काथ्याच्या धंद्यांतील मजुरी**—त्रावणकोर-कोचीनमधील काथ्याच्या धंद्यांतील मजुरांचें किमान वेतन ठरविण्यासाठी मालकांच्या व नौकरांच्या प्रतिनिधींचें एक कमिशन नेमण्यांत आलें आहे. ह्या धंद्यांत सुमारें ५ ते ६ लाख कामगार खपत असावे, असा अंदाज आहे.

**अ. भा. आर्थिक परिषद्**— इंडिअन टॅरीफ बोर्डाचे अध्यक्ष डॉ. डे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं पाटणा येथें अखिल भारतीय आर्थिक परिषदेचें अधिवेशन ता. २३ ते २५ डिसेंबरपर्यंत भरणार असल्याचें जाहीर झालें आहे.

**नडिआदला गवताची बँक**— नडिआद येथील मामलेदारानें गरीब शेतकऱ्यांना मोफत गवत पुरविण्यासाठीं एक गवताची बँक काढली आहे. ज्यांच्याजवळ स्वतःच्या गुरांना पुरून उरण्यासारखें गवत असेल त्यांनीं तें बँकेंत जमा करण्याची विनंति करण्यांत आली आहे. नडिआद भागांत अवर्षणामुळें दुष्काळ पडला आहे.

**अमेरिकेजवळील तेल १०० वर्षें पुरेल**—अमेरिकेला पुढील १०० वर्षें तरी तेलाचा तुटवडा पडणार नाहीं, असें अमेरिकन् भूस्तर शास्त्रज्ञांच्या एका संस्थेनें नुकतेंच जाहीर केलें आहे.



# टाटा ॲग्रिको
अ व जा रें

## अधिक धान्य पिकविण्यास त्यास साह्य करतात

मजबूत, टिकाऊ व वापरण्यास सुलभ अशीं ॲग्रिको अवजारें देशांत सर्वत्र शेतकरी प्रथम पसंत करतात — सफल शेतीसाठीं तीं अत्यावश्यक प्राथमिक साधनें होत.


शेतीच्या हरएक कामासाठीं उपयुक्त असें ॲग्रिको अवजार मिळूं शकतें.



**पावडीं :** निरनिराळ्या परिस्थितींत काम करण्यासाठीं सुयोग्य असे पांच नमुने. इतर सर्व ॲग्रिको अवजारांप्रमाणेंच उंची कार्बन पोलादी पत्र्यांपासून बनविलेलीं व पाणी दिलेलीं असतात व त्यांना पक्के लाकडी दांडे बसविलेले असतात.



**मम्मटी :** सुविख्यात स्वान-नेक सह तीन निरनिराळे नमुने. त्यांना तीक्ष्ण धार असल्यानें तीं खात्रीनें कामाची कार्यक्षमता वाढवितात. समतोल रचनेमुळें तीं वापरणें सुद्धां अत्यंत सुकर असतें.



**पिकाव व बीटर्स :** निरनिराळ्या प्रकारचीं कामें करण्यासाठीं चार प्रमुख नमुने. धार बरेच दिवस टिकावी म्हणून त्यांचीं टोकें मुद्दाम विशेष मजबूत बनविलेलीं असतात. अत्यंत दणगट व दिर्घकाल टिकतात.

# टाटा ॲग्रिको अ व जा रें

दि टाटा आयर्न ॲण्ड स्टील कंपनी लि.

सेल्स ऑफिस : २३-बी. नेताजी सुभाष रोड, कलकत्ता

शाखा : मुंबई, मद्रास, नागपूर, अहमदाबाद, कानपूर, सिकंदराबाद, विजयनगरम् कँटनमेंट व जलंदर कँटनमेंट.

# अर्थ

बुधवार, ता. २८ नोव्हेंबर, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकांच्या कर्जांची छाननी

### अनुत्पादक व सोन्याच्या तारणावरील कर्जांत वाढ

रिझर्व्ह बँकेनें बँक रेट वाढविल्यापासून त्याचा व्यापार, उद्योगधंदे, बँका, सरकारी रोखे, इत्यादींवर काय परिणाम होईल ह्याविषयीं चर्चा सुरू झाली आहे. त्या चर्चेस उपयुक्त होईल असे कांहीं ताजे १९५० चे आंकडे उपलब्ध झाले आहेत. व्यापारी बँकांनीं दिलेल्या एकूण कर्जापैकीं निम्मी कर्जे व्यापारासाठी व एक तृतीयांश कर्जे कारखानदारीसाठी होती. शेतीच्या उत्पादनासाठी बँकांनीं दिलेलीं कर्जे विचारांत घेण्याइतकीहि नव्हतीं. एकूण कर्जापैकीं ८५% कर्जे तारणावरील होती बुडीत व संशयित कर्जे जवळ जवळ नव्हतींच आणि जीं होतीं त्यांचेपेक्षां त्यांचेसाठी केलेली तरतूद जास्त होती. माल, सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, इत्यादींचा भरणाच तारणामध्यें विशेष होता. एकूण कर्जापैकीं फक्त ६% कर्जे मालमत्तेच्या तारणावरील होतीं. कर्जदारांचा प्रकार व त्यांनीं दिलेलें तारण ह्यांचा विचार केला तर हिंदी बँकिंगची परिस्थिति समाधानकारक समजली पाहिजे, असा रिझर्व्ह बँकेच्या मोनेटरी रिसर्च खात्याचा अभिप्राय आहे.

१९४१ चे मानानें १९५० मध्यें शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जांत ८% वाढ झाली. कोरियन यद्धानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचा तो परिणाम आहे. एकूण कर्जांत ८% वाढ झाली, तरी कर्ज घेणारांच्या संख्येंत २१% वाढ झाली, ही विचारांत घेण्याजोगी बाब आहे. वैयक्तिक व व्यावसायिक कर्जांत वाढ होऊन सोन्याच्या तारणावरील कर्जांहि वाढलीं ह्याचा अर्थ बँकांकडे जाण्याची इष्ट सवय प्रसार पावत आहे हें खरें असलें तरी उत्पादक कारणांऐवजी मोडून खाण्यासाठी कर्जे घेण्याची अधिकाधिक गरज लोकांना भासत आहे, हें उघड दिसून येतें.

जनतेची कर्जविषयक गरज भागविण्यांत कांहीं थोड्या मोठ्या बँकांचाच केवढा तरी वाटा आहे. शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या एकूण कर्जांपैकीं तीन पंचमांश कर्जे केवळ १२ मोठ्या बँकांनीं दिलेलीं होतीं. एक तृतीयांश कर्जे १५ एक्सचेंज बँकांनीं दिलेलीं होतीं आणि उरलेलीं एक शष्ठमांश कर्जे इतर ६० शेड्यूल्ड बँकांचीं होतीं. कपास-कापड, साखर, लोखंड-पोलाद इत्यादि धंद्यांस दिलेल्या कर्जांत प्रमुख हिंदी बँकांचाच हिस्सा अत्यंत मोठा होता. विदेशी एक्सचेंज बँकांचें लक्ष परराष्ट्रीय व्यापार व त्या व्यापाराशीं संबंधित असलेले उद्योगधंदे ह्यांत केंद्रित होतें. लहान शेड्यूल्ड बँकांच्या कर्जांत वैयक्तिक व व्यावसायिक कर्जांचा भरणा, तुलनेनें पहाता, मोठा होता.

शेड्यूल्ड बँकांच्या कर्जांत बरीच वाढ झाली तरी बिगर शेड्यूल्ड बँकांच्या कर्जांत, कर्जदारांची संख्या वाढूनहि, घटच झाली. दोन्ही प्रकारच्या बँकांच्या कर्जदारांचे संख्येंत ५९,००० ची भर पडली. तारणाचे दृष्टीनें विचार केला, तर सोनें-चांदीचे तारणावरील कर्जे बरीच वाढली. ह्या कर्जांचा उपयोग कर्जदारांनीं उत्पादक कार्याकडे न करतां, तीं कर्जे दैनंदिन खर्च भागविण्यासाठी उपयोगांत आणलीं असलीं पाहिजेत. कर्जांच्या संबंधांतील ही गोष्ट चिंतनीय आहे.

## उत्पन्नाचें स्वखुषीनें प्रकटन

### नाविन्यपूर्ण योजनेचीं फलप्राप्ति

मे महिन्याच्या अखेरीस ही योजना अधिकृतपणें जाहीर झाली तरी जुलैच्या मध्यापर्यंत तिला एक मोहीम या दृष्टीनें चांगलीशी चालना मिळाली नव्हती. परंतु हळूहळू विशेष लक्षांत न येतां तिची प्रगति झाली. जुलैअखेरीस प्रकट झालेल्या उत्पन्नाचा आंकडा अवघा ६० लक्ष रुपयांचा होता व फक्त ३१ प्रकरणें त्यांत समाविष्ट होतीं. ऑगस्ट महिन्याच्या शेवटीं हेच आंकडे अनुक्रमें ५·५९ कोटी रुपये व १,२८१ प्रकरणें असे होते आणि सप्टेंबरच्या अखेरीस ते अनुक्रमें ११·६८ कोटी रुपये व ५,८१२ प्रकरणें असे होते. परंतु उत्पन्न जाहीर करण्याची २२ ऑक्टोबर हीच तारीख निश्चित केली होती. तरी याबाबतींत ऑक्टोबर महिन्यांतच कमाल मर्यादा गांठली. त्या दिवशीं आतांपर्यंत प्रकट केलेल्या उत्पन्नाची एकूण रक्कम ४४·७८ कोटी रुपये झाली व त्यांत १४,२३३ प्रकरणें समाविष्ट होतीं.

उत्पन्न जाहीर करण्याची मोहीम संपली तरी ती कल्पना सर्वत्र फोफावल्यानें अजूनही जवळजवळ दररोज निरनिराळ्या कमिशनरांच्या कचेऱ्यांकडे उत्पन्नाबाबतची माहिती येत आहे. कायद्यानें हीं उत्पन्नें स्वीकारतां येतात. २२ ऑक्टोबरपासून १५ नोव्हेंबरपर्यंत आणखी ४०० इसमांकडून ४·७२ कोटी रुपये उत्पन्नाची माहिती खात्याकडे आली.

### उघड करून दाखविलेलें उत्पन्न

या मोहिमेनुसार भारतांतील बहुतेक सर्व भागांत छपविलेलें उत्पन्न उघड करण्यांत आलें असून याबाबत प्राप्ती कर कमिशनरांकडून पुढील आंकडे मिळाले आहेत:—

| | उघड करून सांगितलेली रक्कम (कोटी रु.) | कर भरणाऱ्यांची संख्या |
|---|---|---|
| मुंबई शहर | ८·८ | ८२० |
| मुंबई : दक्षिण व मध्यविभाग | ·८९ | १८९ |
| मुंबई : उत्तर विभाग | ३·९५ | १९५६ |
| उत्तर प्रदेश | ११·४१ | ५१२० |
| पश्चिम बंगाल | ६·०३ | ३७७ |
| कलकत्ता मध्य विभाग | ३९ | ४ |
| मद्रास | ४·८८ | ३२७७ |
| बिहार व ओरिसा | २·६३ | २७५ |
| दिल्ली | २·०५ | ८३७ |
| पंजाब | १·६७ | ७६६ |
| मध्यप्रदेश व भोपाळ | १·०७ | २३४ |
| म्हैसूर-त्रावणकोर-कोचीन | ·६४ | १०१ |
| हैदराबाद | ·२२ | २६९ |
| आसाम | ·१३ | ८ |

## खेडेगांवी कर्जपुरवठ्याच्या पहाणीस प्रारंभ

### रिझर्व्ह बँकेचा उपक्रम

शेतीविषयक कर्जपुरवठ्याचें धोरण निश्चित करण्याच्या दृष्टीनें शेतकऱ्यांना कर्जें देणाऱ्या संस्थांची पहाणी रिझर्व्ह बँकेनें सुरू केली आहे. शेतकऱ्यांच्या कर्जविषयक ( अल्प, मध्यम व दीर्घ मुदतींच्या ) गरजा, त्यांना कर्जें देणाऱ्या संस्था, कौटुंबिक बचतीचें व तुटीचें स्वरूप, भांडवल संचय, इत्यादींप्रमाणेंच शेती कर्जविषयक आणि सावकारी नियंत्रणविषयक कायद्यांचे खेडेगांवीं कर्जपुरवठ्यावर परिणाम ह्यांचाहि अभ्यास ह्या पहाणींत केला जात आहे. भारतांतील २० संघराज्यांतील ७५ जिल्ह्यांत ही पहाणी केली जाईल. ती जून, १९५२ अखेर पुरी होऊन त्यानंतर कांहीं महिन्यांनीं पहाणीचा अहवाल तयार होईल असा अंदाज आहे. शेतीविषयक परिस्थितीच्या साम्याच्या दृष्टीनें भारताचे ३२ विभाग पाडले आहेत व त्यांतील ७५ जिल्ह्यांची निवड 'रँडम सँपलिंग' पद्धतीनें करण्यांत आली आहे. प्रत्येक जिल्ह्यांतील ८ खेड्यांची म्हणजे एकूण ६०० खेड्यांची निवडहि ह्याच पद्धतीनें केलेली आहे. शेती व तदनुषंगिक गरजांच्या दृष्टीनें शेतकऱ्यांची पहाणी करण्यासाठी ह्या प्रत्येक खेड्याचा अभ्यास केला जाईल. सरकारी तगाई व इतर कर्जें, सहकारी संस्था, व्यापारी बँका, सावकार, घाऊक व्यापारी, इत्यादींमार्फत खेडेगांवांच्या पतविषयक गरजा कितपत पुरविल्या जातात, त्यांत अडचणी कोणत्या येतात व त्या दूर कशा करतां येतील, ह्याबाबत विचार पहाणीमध्यें केला जाईल.

### नाशिक जिल्हा सहकारी परिषद्

नाशिक जिल्ह्यांतील सर्व सहकारी कार्यकर्ते व सहकारी अधिकारी व नोकर यांची जिल्हा परिषद् ता. १४ व १५-१०-१९५१ रोजीं नाशिक जिल्हा लोकल बोर्डाच्या नवीन इमारतीच्या हॉलमध्यें श्री. वामनराव गोविंदराव पाटील, चेअरमन डि. को. बोर्ड जि. नाशिक यांचे अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आली. या परिषदेंत नाशिक जिल्ह्यांतील पीकपाणी याबाबत आढावा घेऊन व दुष्काळ परिस्थितिसंबंधीं विचार करून त्यास अनुसरून ठराव करण्यांत आले.

### पू. खानदेश जि. सहकारी परिषद्

पूर्व खानदेश जिल्हा सहकारी बोर्डाचें विद्यमानें जिल्ह्यांतील सर्व सहकारी संस्थांची जिल्हा सहकारी परिषद्, जळगांवांत दि ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर रोजीं भरणार आहे. परिषदेचें उद्घाटन मुंबई राज्याचे राज्यपाल सर महाराजसिंग हे करणार आहेत. श्री. बी. डी. देशमुख हे परिषदेचे अध्यक्ष राहातील.

**फिनॅन्स कमिशनच्या अध्यक्षाचा पगार—** भारतीय सरकारनें नव्यानें नेमलेल्या फिनॅन्स कमिशनचे अध्यक्ष श्री. के. सी. नियोगी ह्यांना दरमहा ३,५०० रुपये पगार मिळणार आहे. त्याशिवाय ते अध्यक्ष असेपर्यंत त्यांना दिल्ली येथें सुखसोयींनीं युक्त असें एक घरहि रहाण्यासाठी मिळणार आहे.

**बनारस विद्यापीठाला देणगी—** बनारस हिंदु विद्यापीठाला उत्तर प्रदेश सरकारनें चालू वर्षी १ लाख रुपयांची देणगी देण्याचें ठरविलें आहे. देणगीबद्दल कोणतीहि अट घालण्यांत आली नसून तिचा विनियोग करण्याचें विद्यापीठाच्या मर्जीवर सोपविण्यांत आलें आहे, असें समजतें.


## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवीवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay



( मिरज येथें १९१९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

## दि मिरज स्टेट बँक लि.

**—मिरज—**

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९१९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. ११,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )

★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन. के. डी. शिराळकर मॅनेजर




## चहाचें जागतिक उत्पादन

जगांतील चहाचें उत्पादन मुख्यतः पूर्व आशिआंतील देशांत केंद्रित झालें आहे. अलीकडे पूर्व आफ्रिकेंतहि चहाची लागवड थोडीफार होऊ लागली आहे. पश्चिम गोलार्धांत फक्त ब्राझिल ह्या देशांतच चहाची लागवड केली जाते आणि तीहि लहान प्रमाणावर. एकूण १४ देश चहाची लागवड करतात. दुसऱ्या महायुद्धापूर्वी चहाच्या उत्पादनांत वाढ होत होती. त्यानंतरहि भारत, पाकिस्तान व सीलोनमध्यें उत्पादन वाढत गेलें. परंतु इंडोनेशिआसारख्या कांहीं देशांतून तें कमी होत गेलें. हा युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम होय. चहाचें माहेरघर चीन होय. त्या देशांतील चहाच्या उत्पादनाचे अलीकडील आकडे उपलब्ध नाहींत. १८३० पर्यंत चहाचा मुख्य पुरवठा चीनकडूनच होत असे. चहाचीं झाडें फक्त चीनमध्येंच आहेत अशी समजूत होती. परंतु १८२३ च्या सुमारास आसाममध्यें चहाचीं रानटी रोपें मोठ्या प्रमाणावर आढळून आलीं. ह्या रोपट्यांची व्यापाराला अनुकूल अशी लागवड करतां येणें शक्य असल्याचें दिसून आल्यावर भारताखेरीज इतर देशांतूनहि त्यांची लागवड करण्यांत येऊं लागली. चहाच्या दर एकरीं उत्पादनांत गेल्या ६० वर्षांत एकसारखी प्रगति झालेली दिसून येते. १८८८ च्या सुमारास भारतामधील चहाच्या मळ्यांचें दर एकरी सरासरी उत्पादन २५० पौंड होतें. हल्लीं सरासरी उत्पादन ९०० पौंड होऊं शकतें.

गेल्या अकरा वर्षांतील उत्पादनाचा तक्ता

( आंकडे लाख पौंडांचे )

| | उत्तर भारत व पाकिस्तान | द. भारत |
|---|---|---|
| १९३९ | ३७४२ | ७८४ |
| १९४० | ३८५१ | ७८८ |
| १९४१ | ४२०१ | ८१० |
| १९४२ | ४६८५ | ९५२ |
| १९४३ | ४५७६ | ९७३ |
| १९४४ | ४१२४ | ९७२ |
| १९४५ | ४३८१ | ९२४ |
| १९४६ | ४९७२ | ९६४ |
| १९४७ | ५०७० | ९६२ |
| १९४८ | ५१२२ | १००५ |
| १९४९ | ५३३३ | ९९१ |

निरनिराळें हवामान, भिन्न प्रकारची जमीन आणि समुद्रसपाटीपासूनची उंची ह्यांच्यामुळें प्रत्येक भूभागांतील चहाचा प्रकार वेगवेगळा झाला आहे.

सीलोनमधील चहाची लागवड १८७० साली होऊं लागली त्यापूर्वीं सीलोनमध्यें मुख्यतः कॉफीचे मळे होते. परंतु त्या साली कॉफीवर रोग पडल्यानें चहाची लागवड करण्यांत येऊं लागली. आज चहाचा धंदा हा सीलोनचा एक प्रमुख धंदा आहे. सीलोनच्या निर्यातींत चहानें ६० टक्के जागा व्यापली आहे. सीलोनमध्यें चहाचे मळे सुमारें २,४०० आहेत. सीलोनचें उत्पादनहि सारखें वाढत गेलें आहे.

गेल्या अकरा वर्षांतील चहाचें सिलोनमधील उत्पादन

(आकडे लाख पौंडाचे)

| | | | |
|---|---|---|---|
| १९३९ | २३७३ | १९४५ | २७६९ |
| १९४० | २६५१ | १९४६ | २८२९ |
| १९४१ | २४७९ | १९४६ | २९८५ |
| १९४२ | २९१४ | १९४८ | २९८८ |
| १९४३ | २६८८ | १९४९ | २९८६ |
| १९४४ | २९६९ | | |

इंडोनेशिआंत चहाची लागवड १८२९ पासून होत होती. परंतु लागवडीला जोराची सुरवात १८७८ साली आसाममधील रोपटी आणल्यानंतर झाली. जाव्हा आणि सुमात्रा ह्या दोन्ही बेटांत चहाची लागवड केली जाते.

गेल्या अकरा वर्षांतील चहाचें इंडोनेशिआंतील उत्पादन

(आकडे लाख पौंडाचें )

| | | | |
|---|---|---|---|
| १९३९ | १८३६ | १९४५ | ... ... |
| १९४० | १८१० | १९४६ | ... ... |
| १९४१ | १९४२ | १९४७ | ३३ |
| १९४२ | ५४६ | १९४८ | २८६ |
| १९४३ | ...... | १९४९ | ५९९ |
| १९४४ | १०.३ | | |

जगाच्या चहाच्या बाजारांत इंडोनेशिआकडून होणाऱ्या पुरवठ्याला महत्त्वाचें स्थान आहे. कारण युद्धामुळें फारच कमी झालेलें त्या देशाचें चहाचें उत्पादन पूर्ववत् होऊं लागल्याशिवाय जगाची गरज पूर्णपणें भागणार नाहीं.

चीन हा देश चहाचें उत्पादन करण्यांत पहिला आहे. बहुतेक चहा त्या देशांतच खपून जातो. तथापि निर्यातहि कांहीं कमी होत नसे. युद्धापूर्वी चीनमधून दरवर्षी सरासरी ९,९०,००,००० पौंड चहा निर्यात होत असे. तेव्हांपासून निर्यात कमी होऊं लागली आणि १९४९ मध्यें अवघा १,६०,००,००० पौंड चहा निर्यात करण्यांत आला. चीनमध्यें चहाचे मोठे मळे असे नाहींत. छोटे शेतकरी आपआपल्या शेतावर चहा पिकवितात त्यामुळें इंडोनेशिआंतील मळ्यांचें जपानला जसें नुकसान करतां आलें, तसें चीनमध्यें करतां आलें नाहीं.

जपानमधील युद्धापूर्वीचें चहाचें उत्पादन दरवर्षी सुमारें १२,००,९०,००० पौंड असे. युद्धकालांत उत्पादन घसरलें त्यानंतर तें पुन्हां वाढूं लागलें असलें तरी अजून पूर्वी इतकें होत नाहीं.

गेल्या अकरा वर्षांतील चहाचें जपानमधील उत्पादन

( आंकडे लाख पौंडांचें )

| | | | |
|---|---|---|---|
| १९३९ | १२६६ | १९४५ | ४२१ |
| १९४० | १२८३ | १९४६ | ४७२ |
| १९४१ | १३६४ | १९४७ | ४८८ |
| १९४२ | १३४५ | १९४८ | ५७३ |
| १९४३ | १२४४ | १९४९ | ६१५ |
| १९४४ | १०३७ | | |

गेल्या महायुद्धांत फोर्मोसा बेट जपाननें व्यापलें होतें. त्यावेळीं तेथील चहाच्या उत्पादनांत थोडीबहुत वाढ झाली. फोर्मोसा बेटाचें युद्धपूर्वकालांतील वार्षिक सरासरी उत्पादन २,५०,००,००० पौंड होतें. आशिआ खंडांत मलाया व इराणसारखे कांहीं देशहि चहाचें उत्पादन करतात.

पूर्व आफ्रिकेंत चहाच्या लागवडीखाली सुमारें ५२,००० एकर जमीन आहे. पूर्व आफ्रिकेचें वार्षिक सरासरी उत्पादन सुमारें ५,००,००० पौंड आहे. ब्राझिलमधील चहाच्या लागवडीला युद्धापूर्वी नुकतीच सुरवात झाली होती. १९४४ साली ब्राझिलमध्यें ८,००,००० पौंड चहा तयार झाला. १९४९ साली चहाचें उत्पादन १५,००,००० पौंड इतकें झालें.

### शेतीच्या व बाजाराच्या रेडिओवरील बातम्या

अमेरिकेंत सुमारें २,२०० रेडिओ स्टेशन्स आहेत. त्यांपैकी निदान १,३०० स्टेशन्स तरी राष्ट्रांतील निरनिराळ्या बाजारपेठांच्या वार्ता अमेरिकन शेतकऱ्यांसाठी रोज देत असतात.

**पेटंटच्या अर्जांत वाढ: मुंबई व बंगाल ह्यांचा पुढाकार**

पेटन्टसाठीं १९४९ सालांत १७२५ अर्ज सादर करण्यांत आले होते, तर १९५० सालांत ही संख्या वाढून १८५१ झाली. परंतु यांपैकीं भारतांतील अर्जांची संख्या गेल्या वर्षी इतकीच म्हणजे ३९९ होती. त्यापैकीं निम्म्याहून अधिक अर्ज केवळ मुंबई व बंगाल राज्यांतील होते. बाकीच्या अर्जांत मद्रास, दिल्ली, उत्तर प्रदेश व म्हैसूर यांचेंच प्रमाण अधिक होतें. नमुन्यांच्या नोंदणीसाठी १९४९सालांत ९२० अर्ज दाखल झाले होते तर १९५० सालांत ही संख्या १,२४५ झाली. अर्जांपैकीं ९५ टक्के अर्ज भारतांतील होते, आणि त्यांतही केवळ मद्रास व मुंबई राज्यांतील अर्जांची संख्या ८० टक्के होती. परदेशांहून आलेल्या अर्जांपैकीं बरेच अर्ज इंग्लंडमधून आले होते. भारतांतील अर्जांत कापडाचे आणि इतर पदार्थांचे नमुने यांचें प्रमाण सारखेंच होतें. या वर्षीतील पेटन्ट ऑफिसचें उत्पन्न व खर्च अनुक्रमें ५॥। लक्ष रुपये व ३॥ लक्ष रुपये याप्रमाणें होतें, तर १९४९ मध्यें हे आंकडे अनुक्रमें ६। लक्ष व ३॥। लक्ष रुपये असे होते.

---

**दि बेलापूर कं. लि.**

वरील कंपनीचा ३० सप्टेंबर, १९५१ अखेरचा ताळेबंद प्रसिद्ध झाला आहे. कंपनीनें अहवालाचे वर्षी ९२,७२,७९३ रु. ची साखर विकली. वर्ष अखेर १९,२७,९५२ रु. ची साखर कंपनीच्या गुदामांत शिल्लक होती. भारत सरकारच्या हुकुमाप्रमाणेंच साखर बाहेर काढतां येत असल्याकारणानें हें अपरिहार्य आहे. गुळाला चांगला भाव होता, त्यामुळें कंपनीला आजूबाजूच्या शेतकऱ्यांचा ऊंस पूर्ववत मिळूं शकला नाहीं. अन्न खात्यानें घालून दिलेल्या उद्दिष्टाइतकी साखर कंपनी करूं न शकल्यानें खुल्या बाजारांत विकण्याजोगी साखर कंपनीजवळ राहिलीच नाहीं. ४,९५,४०२ रु. घसारा व १५,००,००० इनकम-टॅक्स अशी तरतूद करून २०,६५,८९० रु. निव्वळ नफा उरला. भागदारांना प्रत्येक भागावर १४ रु. करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे. कंपनीचा ताळेबंद १,८५,०४,७८५ रु. चा आहे. मॅनेजिंग एजंटांना ऑफिस अलावन्स व कमिशन मिळून ४,६६,८२२ रु. मिळाले.

---

**दि आदर्श कृषि संस्था लि., धुळें**

वरील कंपनीस १२ जून, १९५१ अखेर संपलेल्या वर्षी सुपरव्हिजन चार्जेस ३,७७५ रु.+कमिशन ९९७८ रु. =१३,७५३ रु. उत्पन्न मिळालें व सर्व खर्च वजा जातां ४,१९० रु. नफा ताळेबंदाकडे घेण्यांत आला. श्री कृषि साधन लि. ( स्प्रे पंप, हर्स्टिंग मशिन्स, इ. चा कारखाना ), सामुदायिक शेतीसाठी दहिवड येथें वसाहत, नंदनवन डेअरी कं. इत्यादि उपक्रम संस्थेनें केले आहेत. संस्थेची भांडवली ताकद वाढविण्यासाठी प्रचारक नेमण्याची सुरवात संस्थेनें केली आहे. कंपनीचें वसूल भांडवल २३,३७५ रु. व एकूण खेळतें भांडवल ८५,५०८ रु. आहे. संस्थेनें आतांपर्यंत ६%, ६%, ८% आणि १०% डिव्हिडंड वाटलें आहे. ( चेअरमन: ह. त्र्यं. गद्रे. मॅ. डायरेक्टर: द. वि. जावडेकर. वार्षिक सभा: ३०–१०–५१ )

---

**अमेरिकन रेल्वे रस्त्यांची लांबी**

अमेरिकेंतील रेल्वे रस्त्यांची एकूण लांबी सुमारें ३,९७,५०० मैल आहे. ह्या लांबींत मुख्य मार्ग, त्यांना जोडणारे उपमार्ग व साइडिंग्ज ह्या सर्वांचा समावेश करण्यांत आला आहे. हा सर्व रेल्वे रस्ता रोज उपयोगांत असणारा असा आहे.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

शेड्यूल्ड बँक: हेड ऑफिस–लक्ष्मी रोड, पुणें २.

भांडवल

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. ३२,००,००० |
| वसूल झालेलें ... ... ... | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... ... | रु. ५,१७,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... ... | रु. ३ कोटींचे वर |

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

★ लेटर्स ऑफ क्रेडिटची व्यवस्था.

★ बँकेच्या बांधत असलेल्या टोलेजंग इमारतींत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय होणार.

★ एक्झिक्युटर व ट्रस्टीचीं कामें महाराष्ट्र एक्झिक्युटर आणि ट्रस्टी कंपनी करते.

चिं. वि. जोग
मॅनेजर.

# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई,
स्थापना साल १९११

चेअरमन:–श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. ४८,२६,००० |
| गंगाजळी फंड | रु. ३३,४१,००० |
| ठेवी | रु. ८,६१,९७,००० |
| खेळतें भांडवल | रु. १०,४३,९३,००० |

## १५ जिल्ह्यांत ६५ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## पंचवार्षिक योजनेवर चर्चा.

दिल्ली येथें 'इंडिअन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स' तर्फे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ श्री. ध. रा. गाडगीळ ह्यांचें भारताच्या पंचवार्षिक योजनेवर नुकतेंच एक व्याख्यान झालें. अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख हे अध्यक्षस्थानीं होते. व्याख्यानांतील कांहीं महत्त्वाचा भाग पुढें दिला आहे.

श्री. गाडगीळ म्हणाले कीं ह्या योजनेला विकासाचा कार्यक्रम असें संबोधतां येणें कठिण आहे. त्यापेक्षां, येत्या पांच वर्षांत सरकार कसा खर्च करणार आहे त्यासंबंधींचा खर्डा असें नांव त्याला अधिक शोभून दिसेल. योजनाबद्ध अर्थव्यवस्थेच्या ज्या मूलभूत कसोट्या आहेत, त्यांपैकीं एकाहि कसोटीला हा कार्यक्रम उतरणार नाहीं. माझ्या मतानें ह्या कार्यक्रमामुळें उत्पादनवाढीचें ध्येय तर सिद्धीस जाणार नाहींच, पण भारतीय समाजांतर्गत निरनिराळ्या थरांत उत्पन्नाचे बाबतींत जी विषमता आहे तीहि कमी होणार नाहीं. त्यामुळें कार्यक्रमाला लोकांच्या उत्साहाचा पाठिंबा मिळणें अवघड वाटतें. आर्थिक विकासाचा अर्थ काय? आर्थिक व्यवहार अधिक गुंतागुंतीचे करणें आणि अधिकाधिक लोकांना शेतीच्या व्यवसायांतून काढून घेऊन उद्योग–प्रधान व्यवसायांत गुंतविणें हा आर्थिक विकासाचा अर्थ आहे. भारतामधील नागरिकाचे दरडोई राष्ट्रीय उत्पन्न वाढवावयाचें असेल तर असें करणें अपरिहार्यच आहे.

एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकीं किती टक्क्यांची बचत केली जाते ह्याविषयीं नीटसा अंदाज उपलब्ध नाहीं, परंतु ही बचत पांच टक्के असावी ह्याविषयीं सामान्यतः एकमत आहे. ही बचत फारच अल्प आहे. राष्ट्रीय उत्पन्नांतून अधिक बचत करण्याच्या मार्गांत अडचणी आहेत हें खरें, पण त्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं. देशापुढील मोठमोठे आर्थिक प्रश्न सोडवावयाचे असतील तर अधिक बचत करावीच लागेल. अतिशय बिकट अशा ह्या अडचणींचा निरास झाला तरीहि कार्यभाग होत नाहीं. ही सर्व बचत एका मध्यवर्ती संचयांत गुंतविली गेली पाहिजे. तसें केल्यानें पैसे गुंतविण्याच्या बाबतींतील पौर्वापर्यता सरकारला ठरवितां येईल. त्याचप्रमाणें प्रत्येक धंद्याला उत्पादनविषयक उद्दिष्टें ठरवून देतां येतील आणि तीं पूर्ण करतां येतील. सध्या जो पंचवार्षिक कार्यक्रम आंखला गेला आहे, त्यांत श्रीमंत आणि मध्यम वर्गाच्या उपभोगवृत्तीवर नियंत्रण नाहीं. परदेशीय व्यापारावर नियंत्रण असावें हें सर्वांना मान्य असूनही त्या व्यापारावर नियंत्रण ठेवण्याची व्यवस्था कार्यक्रमांत नाहीं. मोठमोठे उद्योगधंदे, परदेशीय व्यापार, इत्यादींवर नियंत्रण ठेवल्यानेंच बचतीचें प्रमाण वाढवितां येणें शक्य आहे. सरकारनें खाजगी भांडवलवाल्यांना अधिक श्रीमंत होऊं देऊन त्यांच्याकडून देशाचें औद्योगीकरण करवावें अगर आजचीं उत्पादनसाधनें समाजाच्या मालकीचीं करून देशाच्या औद्योगिक विकासाचा पाया घालावा, पण सध्याचें अनिश्चित धोरण देशाला फार घातक आहे.

अर्थमंत्री श्री. देशमुख आपल्या भाषणांत म्हणाले कीं समाजवादाचें तत्त्व कोणाला संमत नसण्याचें कारण नाहीं. खरा प्रश्न असा आहे कीं पांच वर्षांच्या कालावधींत हें कार्य सरकारला झेपेल किंवा नाहीं? त्यासाठीं लागणारी यंत्रणा व माणसें सरकारला मिळूं शकतील किंवा नाहीं? सरकारनें नियंत्रणाचा जो कायदा नुकताच मंजूर केला आहे त्यावरून उद्योगधंद्यांच्या बाबतींत एक धोरण आखण्याचा सरकारनें प्रयत्न केला आहे असें दिसून येतें. परराष्ट्रीय व्यापाराच्या बाबतींत निश्चित धोरण कार्यक्रमांत नाहीं हें खरें आहे; परंतु पंचवार्षिक योजनेच्या अंतिम मसुद्यांत ह्या प्रश्नाचा विचार केला जाईल. प्राप्त परिस्थितींत जी योजना आंखली आहे तींत सध्याच्या प्रश्नावर मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही योजना पूर्ण झाल्यावर श्री. गाडगीळ ह्यांना जशी परिस्थिति पाहिजे आहे तशी ती निर्माण होईल, असें मला वाटतें. उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाला अनकूल अशी परिस्थिति निर्माण करण्याचा प्रयत्न ह्या कार्यक्रमानें चालविला आहे. श्री. गाडगीळ ह्यांच्या मतांचा योग्य तो विचार अखेरचा कार्यक्रम तयार करतांना होईल. तोंपर्यंत कार्यक्रमाविषयीं निराश होण्याचें कारण नाहीं.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा:
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
ठेवी १ कोटीवर
हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.

### उत्पन्नाचें स्वखुषीनें प्रकटीकरण

स्वखुषीनें उत्पन्न प्रकट करण्याची योजना २२ ऑक्टोबरला संपली असून अशीं प्रकरणें निकालांत काढण्याचें काम सुरू झालेलें आहे. कलकत्त्यामध्यें २२ ऑक्टोबरपर्यंत ३८२ प्रकरणें खात्याकडे आलीं असून १५ नोव्हेंबर पर्यंत ३५१ प्रकरणें निकालांत काढण्यांत आलीं. म्हणजे आतां फक्त ३१ प्रकरणें काय ती शिल्लक राहिलीं आहेत. वरील मोहीम २२ ऑक्टोबरला संपली असली तरी कांहीजण स्वखुषीनें आपली माहिती कळवीत आहेत. अशा प्रकारें प्रकट झालेल्या प्रकरणांची संख्या १५ नोव्हेंबरपर्यंत ४७५ होऊन त्यांतील छपविलेल्या उत्पन्नाची रक्कम ५॥ कोटी रुपये होती. आजतागायत प्रकट झालेली एकूण रक्कम ५० कोटी रुपयांहून अधिक आहे.

## सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास

नाशिक जिल्ह्यासाठीं सर्व सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरीचा ट्रेनिंग क्लास, चांदवड येथें ता. ३-१२-१९५१ ते १६-१-१९५२ अखेर मुदतीचा घ्यावयाचा आहे. ज्या उमेदवारांस सहकारी शिक्षण घ्यावयाचें असेल त्यांनीं खालील सही करणार यांजकडे ता. १-१२-१९५१ चे आंत अर्ज करावेत. अर्जासोबत क्लास फी रु. ३ लगत पाठवावी. उमेदवाराचें शिक्षण निदान व्ह. फा. पास झालेला अगर सहकारी संस्थेंत काम करीत असला पाहिजे. उमेदवारास सदर शिक्षण स्वखर्चानें घ्यावें लागेल. क्लास फी भरल्यानंतर कोणत्याही सबबीवर परत केली जाणार नाहीं. क्लासानंतर परीक्षेंत यशस्वी उमेदवारांना सेक्रेटरी म्हणून नेमण्याची व्यवस्था करण्यांत येईल. उमेदवारांनीं, चांदवड येथें, चांदवड तालुका को-ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग यूनिअनचें ऑफिसांत समक्ष ता. ३-१२-१९५१ रोजीं ११ वाजतां बिनचूक हजर व्हावें.

एन. वाय. कुळकर्णी
को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर,
(घर नं. २१७८, मधली होळी) नाशिक.

॥ श्री ॥

# श्री आदर्श कृषि संस्था लि. धुळें (प. का.)

## पांचवी सर्वसाधारण वार्षिक सभा

आदर्श कृषि संस्था लि. या कंपनीचे पांचव्या वार्षिक सर्व साधारण सभेचे वेळीं, कंपनीचे चेअरमन श्री. ह. त्र्यं. गद्रे यांनीं केलेलें भाषण.

सद्‌गृहस्थहो,

आपल्या कंपनीच्या पांचव्या वर्षाच्या सर्वसाधारण सभेस आपण हजर राहिलांत याबद्दल आनंद व्यक्त करून आपलें स्वागत करतों.

अजून पावेतों आपले देशांत शेतीचा उपयोग, केवळ मजुरी कमविण्याचा तो एक मार्ग एवढ्या पुरताच केला जातो. वस्तुतः शेती हा एक उत्कृष्ट व्यवसाय समजला जाऊन तो व्यावसायिक पद्धतीनेंच केला पाहिजे. हें प्रत्यक्ष घडावें या करतां बुद्धिवान व ज्ञाते यांनीं जास्तीत जास्त लक्ष शेती या व्यवसायाकडे दिलें पाहिजे.

देशाच्या औद्योगिक-विकासाकरतां राष्ट्रीय सरकारच्या ज्या योजना आहेत त्यांत या व्यवसायास प्राधान्य देण्यांत आलें आहेच. कृषि संस्थेच्या स्थापनेचा उद्देशही असाच असून गेल्या सहा वर्षांत शेती या विषयाशीं संबंधीत अशा उद्योग-धंद्यांची निर्मिती व वाढ करण्याचें काम संस्थेनें केलें आहे. असे उद्योगधंदे एका गटांत सामील राहून चालविले जातील असें संस्था करीत असते. व्यवसायांत यश मिळेल अशी अदृश्य ताकद गटांतलि प्रत्येक व्यवसायास लाभत असते, हें सांगावयासच पाहिजे असें नाहीं.

कृषि संस्थेनें अशा पद्धतीनें सुरू केलेला पहिला व्यवसाय श्री कृषि साधन लि. हा कारखाना होय. या कारखान्यांत हल्लीं स्प्रे-पंप, डस्टिंग मशिन्स इत्यादी माल तयार होतो. तसेंच अद्यावत पद्धतीचीं अवजारें तयार करण्याचें कारखान्याचें ध्येय आहे. कारखान्याचें खेळतें भांडवल रु. १,५०,०००/– पेक्षां अधिक असून माल लोकप्रिय झाला आहे. या कारखान्याचा व्यवसाय किफायतशीरपणें चालू आहे.

सामुदायिकपणें शेती करण्याकरतां संस्थेनें दहिवद, तालुका शिरपूर ( प. कान्हदेश ) येथें वसाहत होण्यांत यश मिळविलें आहे व त्याची प्रगतीहि होत आहे.

नंदनवन डेअरी कंपनी हा संस्थेनें सुरू केलेला तिसरा व्यवसाय आहे. या व्यवसायाकरतां रु. ६,००,०००/– भांडवल लागेल असा अंदाज असून योग्य प्रमाणांत व्यवसाय सुरू होण्यास रु. ३,००,०००/– लागतील. हे तीन लक्ष रुपयांचें भांडवल निश्चितपणें जमा होईल अशी तजवीज झाली असल्यानें या व्यवसायाची प्रगती चांगली होईल अशी खात्री वाटते. या व्यवसायांत मुंबई प्रांताचे भूतपूर्व अर्थमंत्री, मुंबईचे भूतपूर्व नगराध्यक्ष व हिंदुस्थान सरकारचे ब्रह्मदेशांतील भूतपूर्व राजनैतिक प्रतिनिधी बॅरिस्टर जमनादास मेहता यांचें सहकार्य लाभत आहे. कायदा व अर्थ याविषयीं त्यांचेकडून मार्गदर्शन होत आहे.

अनेक व्यवसायांचा गट तयार करणें हा एक किफायतशीर व्यवसाय आहे. गेल्या पांच वर्षांत संस्थेनें केलेलें कार्य भरपूर झालें आहे. संस्थेच्या मामुली ताकदीचे मानानें ते ठीक असलें तरी सांगितलेल्या व्यवसायापेक्षां संस्थेच्या गटांत सामील राहून व्यवसाय केले जातील अशा अनेक उद्योगधंद्यांची भर पडली पाहिजे; हें आपणासारखे सूज्ञ जाणूं शकतात. तसें आपलें ध्येय आहे.

संस्थेच्या आर्थिक व्यवहाराकडे आपण पाहिलें तर अंदाजी रु. ३०००/– उत्पन्न वर्ष संपेपर्यंत जमा होऊं शकलें नाहीं तरीही, गतवर्षापेक्षां अहवालाचे सालीं संस्थेच्या उत्पन्नांत वाढच झाली आहे. हल्लीं चालू असलेल्या वर्षांत व्यवसायाची जी वाढ होत आहे त्या योगें संस्थेचें उत्पन्न रु. १२०००/– नें आणखी वाढेल अशी उमेद आहे.

सद्‌गृहस्थहो ! आपण संस्थेच्या शेअर भांडवलांत जी रक्कम गुंतविलीत त्यावर आतांपर्यंत ६%, ६% व ८% नफा आपणास मिळाला आहेच. आपण मंजूर कराल तर आतां १०% नफा मिळूं शकेल अशी परिस्थिती आहे.

संस्थेची भांडवली ताकद वाढविण्याकरतां प्रचारक नेमण्याची सुरवात संस्थेनें केली आहे. आपण सहकार्य केलेंत तर चालू साल संपेपर्यंतच त्यांचें काम यशस्वी रीतीनें होत असल्याचें निश्चितपणें आढळून येईल.

## पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

### बटाटे बियाण्याची वाटप व्यवस्था

दिवसेंदिवस संस्थेचें कार्य शेतकरी व ग्रामीण भागांतील रहिवाशी यांच्या हरेक प्रकारच्या गरजा भागविण्याकरतां सर्व क्षेत्रांत वाढत आहे.

चालू सालीं पुणें जिल्ह्यांतील बटाटा उत्पादन भागांतील शेतकऱ्यांना लागणारें बटाटा बियाणें सिमला येथें खरेदी करून तें सहकारी पद्धतीवर वाटण्याची योजना हातीं घेतलेली आहे. बटाट्याचें पीक निघालेनंतर त्याच्या विक्रीची व्यवस्थाहि संस्थेनें पुणें येथील मार्केटमध्यें केलेली आहे. या कामाकरितां शेतकऱ्यांना लागणारें मिश्र खतहि संस्थेमार्फत पुरविलें जात आहे.

पुणें जिल्ह्यांत सरकार नियंत्रित कापडाचे घाऊक विक्रेते म्हणून संस्था काम करीत असून, किरकोळ विक्रीचें काम सहकारी सोसायट्यांमार्फत केलें जातें.

पुणें जिल्ह्यांतील विणकरांना लागणारा सुताचा पुरवठा संस्थेमार्फत घाऊक विक्रेते म्हणून होतो.

---

### नाशिक रोड—सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासचा रिझल्ट

नाशिक जिल्ह्यासाठीं भरलेल्या सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास नाशिक रोड येथील परिक्षेचा निकाल लागून खालील विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. एकूण २० विद्यार्थी परिक्षेस बसले त्यांपैकीं पहिले दोन द्वितीय श्रेणींत व नंतरचे आठ तृतीय श्रेणींत येऊन एकूण १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, ते खालीलप्रमाणें—

१. जगन्नाथ यशवंत कूळथे, २. गणपत पांडूरंग गोन्टे, ३. वसंत महादेव जगताप ४. एकनाथ आंबू बिढवाई, ५. सहादू दामोधर जगताप, ६. लक्ष्मणगीर नारायणगीर गोसांवी, ७. भिकाजी वासुदेव सुर्वे, ८. मिर्झा आशदबेग फकीरबेग, ९. पांडूरंग सहादू माळी, १०. मुरलीधर दामोधर शहाणे.

एन्. वाय्. कुलकर्णी
को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर, नाशिक.

---

### कुराणाचें जर्मन भाषांतर

इराणच्या गादीचे भावी अधिपति युवराज प्रिन्स महंमद अली हे कुराणाचे जर्मन भाषेंत भाषांतर करीत आहेत. त्यांनीं कुराणांतील कांहीं भागांचें इंग्लिश भाषांतर छापूर्वीच केलें आहे. मुसलमानी संस्कृतीचें दर्शन घडवून आणणारें एक मोठें वस्तुसंग्रहालय स्थापन करण्याचाहि त्यांचा इरादा आहे.

### चंद्रलोकावरील स्वारीची तयारी

रशिअन स्थापत्यशास्त्रज्ञ चंद्रलोकावरील स्वारीची तयारी करण्यांत गुंतले आहेत. त्यासाठीं जेट पद्धतीनें चालणारें एक विमान बांधण्याची योजना आखण्यांत येत आहे. त्याची लांबी ६० मीटर्स, व्यास १५ मीटर्स आणि वजन १,००० टन असेल.

### रंगीत टेलिव्हिजन

पॅरिसमधील एका इस्पितळांतून एक शस्त्रक्रिया नुकतीच टेलिव्हिजननें पडद्यावर चित्रित करण्यांत आली. पडद्यावर शस्त्रगृहांतील सर्व रंगछटा जशाच्या तशाच दिसून आले. ह्या पद्धतीमुळें शस्त्रक्रिया अगदीं जवळून पहात असल्याचा भास होतो. शस्त्रवैद्यांना शिक्षण देण्यांत टेलिव्हिजनचा फार मोठा उपयोग होईल, असें मत पॅरिसमधील एका प्रख्यात डॉक्टरनें व्यक्त केलेंआहे.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.



पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटणारी

दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

★ प्रमाणशीर खर्चांत मिळेल असें फक्त निवडक काम घेणें हें कंपनीचें ध्येय आहे, व यांतच विमेदारांचें अंतिम हित आहे. ★

सर्वत्र प्रतिनिधी पाहिजेत.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर



दि युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६० लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला (चेअरमन)

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोयंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले,

B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन — कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा,
B. Com., C. A. I. I. B.
मॅनेजर

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिस:—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. वी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) | श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९९,३८५ |

एकूण खेळतें भांडवल ६३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. वाळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. मा. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. १४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

मुख्य कचेरी—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा, मंचर, भोर पौड व वडगांव (मावळ)

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे
मॅनेजिंग डायरेक्टर

# पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

३१२ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ता:—सॅनकोसोप. टेलिफोन नं. ३२१५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे घरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगां-वरील औषधें, पेंड.

★शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गा-ड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५. } ११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.